महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

---

## मेट्रो प्रवाश्यांचा कॅशलेस व्यवहारला कौल

## दररोज सुमारे ४०% मेट्रो प्रवासी करतात महा कार्डचा उपयोग




नागपूर : दररोज व नियमित पणे मेट्रो प्रवाश्याची संख्या वाढत असून या वाढत्या रायडरशिप मध्ये कॅशलेस व्यवहारला नागरिकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. दररोज सुमारे ४०% मेट्रो प्रवासी करतात महा कार्डचा उपयोग करून मेट्रोचा वापर करत आहे.  महा मेट्रोने नेहमीच तिकीट खरेदी करण्यासाठी डिजिटल माध्यमांचा वापर करण्यास प्रोत्साहन दिले आहे. याकरिता मोबाइल ऍप, ऑनलाईन पेमेंट आणि महाकार्डसह अनेक पर्याय प्रवाश्यांना उपलब्ध

करून दिले आहेत.आतापर्यंत ७० हजारपेक्षा अधिक नागरिकांनी महाकार्ड प्राप्त केले असून आहेत.सरासरी प्रतिदन १०० महा कार्ड खरेदी करत आहे. या व्यतिरिक्त पेमेंट करण्याकरिता क्यूआर कोडचा मोठ्या प्रमाणात वापर केल्या जात आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या (SBI) सहकार्याने महा कार्डचे संचालन करण्यात येत आहे.प्रवाश्यांचा प्रवास सुखकर व्हावा तसेच आरोग्याचा विचार करता स्पर्श विहीन व्यवस्थापनाकरिता महा मेट्रोने EMV (युरो मास्टर व्हिसा) स्मार्ट कार्ड आधारित ओपन लूप ऑटोमॅटिक फेअर कलेक्शन (एएफसी) प्रणाली स्वीकारली आहे आणि ही नागपुरातील सर्व मेट्रो स्थानकांवर लागू करण्यात आली आहे. ह्या प्रणालीच्या माध्यमातून प्रवासी महा कार्डचा उपयोग करून कॅशलेस आणि विनास्पर्श, तसेच सवलतींवर सहज सुलभ प्रवास करू शकतात.

महा मेट्रो द्वारे दर शनिवार आणि रविवारी महा मेट्रो मेट्रो प्रवाशांसाठी भाड्यात 30 टक्के सवलत महा मेट्रोच्या वतीने देण्यात येत असून या व्यतिरिक्त राजपत्रित सुटयांचा दिवशी देखील 30% सवलत मेट्रो प्रवाश्याना देण्यात येत आहे.